# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.10.2025** **वारःमंगळवार**

---

1. राज्यातील विविध जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या आरक्षणाची सोडत जाहीर
2. एसटी महामंडळाच्या 85 हजार कर्मचारी, अधिकाऱ्यांना सहा हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची राज्य सरकारची घोषणा,
3. महाराष्ट्राला उद्योगक्षेत्रात कायम अग्रस्थानी ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची उद्योगमंत्री उदय सामंत यांची ग्वाही,
4. दिल्ली क्रिकेट कसोटी जिंकण्यासाठी भारताला 58 धावांची गरज आणि
5. नैऋत्य मौसमी पावसानं महाराष्ट्राचा घेतला निरोप.

**<u>आरक्षण सोडत</u>**

राज्यातील विविध स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची आरक्षणाची सोडत काल पार पडली. पुणे जिल्हा परिषदेच्या 73 गटांपैकी अनुसूचित जातीसाठी 7, अनुसूचित जमातीसाठी 5, तर मागासवर्गीय प्रवर्गासाठी 19 गट राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यापैकी 10 जागा महिलांसाठी आहेत.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या 75 गटांपैकी खुल्या प्रवर्गासाठी 29 गट राखीव ठेवण्यात आले आहेत. 9 अनुसूचित जमातींसाठी, 7 अनुसूचित जातींसाठी तर अन्य 20 गट मागासवर्गीय प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. नंदुरबार जिल्हा परिषदेच्या 56 गट आणि सहा पंचायत समितीच्या 112 गणांसाठी काल आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर, बीड, नांदेड, परभणी, सांगली, नाशिक आणि धुळे जिल्हा परिषदेची आरक्षण सोडतही काल पार पडली.

**<u>मुदतवाढ</u>**

राज्यातल्या नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारुप मतदार याद्यांवर हरकती आणि सूचना नोंदवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 17 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी येत्या ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल.

**<u>बोनस</u>**

एसटी महामंडळाच्या 85 हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट म्हणून सहा हजार रुपये सानुग्रह अनुदान तसंच सणाची उचल म्हणून साडेबारा हजार रुपये देण्याचा निर्णय सरकारने घेतल्याचं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. एसटी कर्मचारी संघटनांची आणि कृती समितीची बैठक मुंबईत काल झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. साडेसहा हजार पगारवाढीची थकित रक्कम देण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी 65 कोटी रुपये खर्च येणार असल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**<u>निर्यात पुरस्कार</u>**

महाराष्ट्राला उद्योग क्षेत्रात कायमस्वरूपी प्रथम क्रमांकावर ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याची ग्वाही उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. गेल्या दोन वर्षांसाठीचे महाराष्ट्र राज्य निर्यात पुरस्कारांचं वितरण काल मुंबईत सामंत यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. दावोस, जर्मनी, जपान यासारख्या परदेश दौऱ्यांतील कराराद्वारे महाराष्ट्रात विक्रमी गुंतवणूक

वाढल्याचं सांगत या सामंजस्य कराराच्या 80 टक्के अंमलबजावणी करणारं महाराष्ट्र हे देशात पहिलं राज्य असल्याचं त्यांनी सांगितलं. सामंत म्हणाले....

**आज आम्ही तीन वर्ष एक क्रमांकावर आहोत. आता तीन वर्षापूर्वी कोणाची सत्ता होती कोण मुख्यमंत्री होते, कोण उपमुख्यमंत्री होते, पर्यावरण मंत्री कोण होते? याच्यात मला अजिबात जायचं नाही. पण आपण सकारात्मक दृष्ट्या जर पुढे गेलो तर एखाद्या विभागाला एक नंबर ला ठेवू शकतो हे शासन आणि प्रशासनानं देशात पहिल्यांदा या महाराष्ट्रामध्ये सिद्ध करून दाखवलेलं आहे. आणि हे कोणामुळे सिद्ध केलं. आम्ही फक्त व्यासपीठावर असतो आणि तुम्ही नसताच तर काहीच झालं नसतं. त्याच्यामुळे व्यासपीठावरच्या मंडळींचं जेवढं श्रेय आहे त्याच्यापेक्षा हजार पटीनं तुमचं श्रेय आहे आणि म्हणून महाराष्ट्र हा उद्योग क्षेत्रामध्ये नंबर एकवर आहे.**

परभणीच्या एका उद्योगाला तर छत्रपती संभाजीनगरच्या दोन उद्योगांना या पुरस्कार सोहळ्यात सुवर्ण पदक देऊन गौरवण्यात आलं. लातूरसह रत्नागिरी, नागपूर आणि गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांना निर्यात वाढीसाठी उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आलं.

**<u>बिल्डथॉन</u>**

उत्पादन-चलित अर्थव्यवस्थेच्या मार्गानेच भारत विकसित देश बनू शकतो, असं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. देशभरात शालेय स्तरावरील विकसित भारत बिल्डथॉन 2025 या हॅकेथॉन स्पर्धेचं उद्घाटन केल्यानंतर ते काल बोलत होते. तीन लाखांहून अधिक शाळा आणि 25 लाखांहून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी या बिल्डथॉनमध्ये आभासी पद्धतीनं भाग घेतला आहे. शिक्षण मंत्रालयानं  अटल इनोव्हेशन मिशन आणि नीती आयोगाच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या या देशव्यापी उपक्रमात शाळा आणि शिक्षकांना तसंच इयत्ता 6 वी ते 12 वीच्या विद्यार्थ्यांना त्यांची सर्जनशीलता आणि समस्या सोडवण्याचे कौशल्य दाखवण्यासाठी आमंत्रित करण्यात आलं आहे. यावर्षीची स्पर्धा, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या चार संकल्पनांवर आधारित आहे.

**<u>वैष्णव</u>**

रेल्वे पोलीस दलातील पदभरती यापुढे कर्मचारी निवड आयोगाद्वारे करण्यात येणार असल्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. त्याचप्रमाणे दिवाळी आणि छट पूजेसाठी 12 हजार विशेष रेल्वे गाड्या चालवणार असल्याचंही त्यांनी जाहीर केलं. गुजरातमध्ये वलसाड इथं रेल्वे पोलीस दलाच्या एकेचाळीसाव्या स्थापना दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात ते काल बोलत होते. यावेळी रेल्वे पोलीस दलातील विविध उपक्रमांची वैष्णव यांच्या हस्ते सुरूवात करण्यात आली. रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांना आधुनिक डिजिटल आणि ड्रोन प्रशिक्षण देण्याची घोषणाही त्यांनी केली.

**<u>फडणवीस</u>**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भाजपाकडून विभागवार बैठका सुरू आहेत. त्यानुसार काल अमरावती विभागाची बैठक झाली. शक्य तिथे महायुती म्हणून निवडणूक लढवण्याला पक्षाचं प्राधान्य आहे. मात्र त्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले....

**एकूणच कार्यकर्त्यांची मानसिकता आणि तयारी चांगली आहे. निवडणुकीकरता पूर्णपणे त्या ठिकाणी आपलं जे काही यंत्रणा म्हणून पार्टी सज्ज आहे आणि त्यांना एक दिशानिर्देश देऊन कशाप्रकारे या निवडणुका करायच्या असा आमचा प्रयत्न आहे. युतीच्या संदर्भातही आम्ही जे काही अधिकार आहेत ते, खाली देतो आहोत पण साधारणपणे जिथे तिथे शक्य आहे तिथे युती केली पाहिजे अशा प्रकारचे निर्देश दिलेले आहेत आणि एखाद्या ठिकाणी युती झाली नाही तरी मित्र पक्षावर टीका करू नये अशा प्रकारचे निर्देश हे त्या ठिकाणी दिलेले आहेत. मला असं वाटतं की महायुती म्हणून या निवडणुकीमध्ये चांगलं यश आमच्या तिन्ही पक्षांना मिळेल.**

**मनसे**

महाविकास आघाडीत मनसेला सामावून घ्यायला काँग्रेसनं विरोध केला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काल मुंबईत काँग्रेस पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यात मुंबई महापालिकेची निवडणूक एकट्यानं लढवण्याची मागणी नेत्यांनी एकमतानं केली. कुठल्याही जागेवर मैत्रीपूर्ण लढत करण्याचा काँग्रेसचा विचार नसल्याचं मुंबई प्रदेशाध्यक्ष वर्षा गायकवाड यांनी या बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. मनसेच्या युतीसंदर्भात पक्ष श्रेष्ठींना भूमिका कळवणार असल्याचं काँग्रेस नेत्यांनी सांगितलं.

**प्रधानमंत्री गतिशक्ती**

पीएम गतिशक्ती योजनेमुळे मोठ्या प्रमाणावर नियोजन आणि सूक्ष्म स्तरावर अंमलबजावणी शक्य झाल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. या योजनेला 4 वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त मुंबईत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या योजनेमधून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी दिसून येते. गेल्या 4 वर्षात पीएम गतीशक्ती विविध क्षेत्रात पोहोचली असल्याचं गोयल म्हणाले. यावेळी पीएम गतिशक्ती च्या 4 नवीन उपक्रमांचं उद्घाटन गोयल यांनी केलं.

**बातमी**

गेली 75 वर्ष अखंडपणे आध्यात्मिक प्रबोधन करण्याचं महत्त्वपूर्ण कार्य सज्जनगड मासिकाने केल आहे असे गौरवोद्गार मराठी नियतकालिक परिषदेचे अध्यक्ष भालचंद्र कुलकर्णी यांनी काढले. श्री समर्थ सेवा मंडळ संचालित सज्जनगड मासिक पत्रिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त सज्जनगड इथं नुकताच लेखक वाचक मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ महाराज कोटणीस, कार्यवाह योगेश बुवा रामदासी, मासिकाचे संपादक डॉक्टर अजित कुलकर्णी, कार्यकारी संपादक मधू नेने आदी मान्यवर उपस्थित होते. या दोन दिवसांच्या मेळाव्यात राज्यातील अनेक मान्यवर लेखक आणि वक्त्यांनी आपले विचार व्यक्त केले.

**सायबर**

दिवाळीनिमित्त समाजमाध्यमांवर विविध कंपन्यांकडून सवलती दिल्या जात आहेत. मात्र, खरेदी योजनांच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करणारे सायबर चोरटेही सक्रिय झाल्याचं पोलिसांच्या तपासात समोर आलं आहे. त्यामुळे ऑनलाइन खरेदी करताना काळजी घेण्याचं  आवाहन सायबर पोलिसांनी केलं आहे.

**क्रिकेट**

दिल्ली क्रिकेट कसोटी जिंकण्यासाठी भारताला आणखी 58 धावांची गरज आहे. कालच्या चौथ्या दिवशी वेस्ट इंडिजनं दुसऱ्या डावात 390 धावा केल्या. भारताकडून कुलदीप यादव आणि जसप्रित बुमराहनं प्रत्येकी 3, तर महंमद सिराजनं 2 गडी बाद केले. दुसऱ्या डावात फलंदाजीला उतरलेल्या भारताचा सलामीवीर 8 धावांवर बाद झाला. कालच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा केएल राहुल 25 आणि साई सुदर्शन 30 धावांवर खेळत आहे.

**हवामान**

नैऋत्य मौसमी पावसाचा महाराष्ट्रातून परतीचा प्रवास पूर्ण झाल्याचं हवामान विभागानं काल जाहीर केलं. देशाचा दक्षिणेकडील भाग आणि ओडिशातून मान्सूनचा परतीचा प्रवास सध्या सुरू आहे. दरम्यान येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं,**

**नमस्कार.**